MHGO040004242022

**नि.दि.दा.क्र. २६/२०२२**
**व्यंकटराव राजाराम तिडके**
**विरुध्द**
**नरेंद्र मोतीराम मेश्राम**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक २६/२०२२ मधील निशाणी २३ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार दाव्यामध्ये विक्रीची रक्कम रुपये १,७०,०००/– अशी नमुद करण्यात आलेली आहे. परंतु सदरची रक्कम ही १,७५,०००/– अशी नमुद करणे आवश्यक आहे. टंकलेखनाच्या चुकीमुळे रक्कम रुपये १,७०,०००/– असे नमुद झालेले आहे. तसेच दाव्यामध्ये परिच्छेद क्र. २ मधील ओळ क्र. १० मध्ये "प्रतिवादी" या शब्दाच्या ऐवजी "वादी" असा शब्द नमुद झालेला आहे. टंकलेखनाच्या चुकीमुळे वादी हा शब्द नमुद झालेला आहे. त्या शब्दाच्या ऐवजी प्रतिवादी हा शब्द नमुद करणे गरजेचे आहे. सबब अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून प्रस्तुतचा अर्ज नाकारला. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार दावा हा पुराव्याकरीता नेमलेला असून प्रस्तुतचा अर्ज उशीराने दाखल केलेला आहे. वादीने दाखल केलेल्या नोटीसीमध्ये देखील रक्कम रुपये १,७०,०००/– ईतकी रक्कम नमुद केलेली आहे. प्रस्तावीत दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने रक्कम वसुलीकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतकामी निशाणी १५ वर मुद्दे निश्चीत झालेले असुन प्रस्तुतचे प्रकरण हे वादीच्या पुराव्याकरीता प्रलंबीत

आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतुदीनुसार प्रस्तावीत दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील वादप्रश्न योग्यप्रकारे निर्गमित करण्याकरीता आवश्यक आहे किंवा कसे व प्रस्तावीत दुरुस्ती ही वादीला दावा पुराव्यावर नेमण्याचे पुर्वी करणे शक्य होते किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता वादीच्या कथनानुसार विक्रीची रक्कम रुपये १,७०,०००/- असे चुकीचे नमुद केले असुन ती रक्कम १,७५,०००/- आहे असे वादीचे कथन आहे. अभिलेखावर दाखल केलेल्या नोटीसीचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील प्रथमदर्शनी रक्कम रुपये १,७०,०००/- असे नमुद केल्याचे दिसून येते. वादीच्या दाव्यातील कथनानुसार त्याने प्रतिवादीला दिनांक १५/०३/२०१७ रोजी आणखी रक्कम रुपये १,४२,०००/- दिलेले होते. वादीने त्यानंतर त्याच्या दाव्यामध्ये असे कथन केले आहे की, त्याने एकुण रक्कम रुपये ३,१७,०००/- प्रतिवादीला दिलेले आहेत. रक्कम रुपये १,७०,०००/- व रक्कम रुपये १,४२,०००/- असे एकुण रक्कम रुपये ३,१२,०००/- ईतकी रक्कम येते. त्यामुळे रक्कम रुपये १,७५,०००/- चे ऐवजी रक्कम रुपये १,७०,०००/- असे टंकलेखनाच्या चुकीमुळे नमुद झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच ईतर प्रस्तावीत दुरुस्ती ही टंकलेखनाच्या चुकीमुळे मागावी लागलेली आहे असे दिसुन येत आहे.

५. प्रस्तावीत दुरुस्ती ही वादीने मुद्दे निश्चीत करण्याच्या पुर्वी अभिलेखावर का आणले नाही याबाबत कोणतेही स्पष्टीकरण वादीने नमुद केलेले नाही. त्यामुळे दावा हा पुराव्याकरीता नेमण्याचे पुर्वी वादीला प्रस्तावीत दुरुस्ती अभिलेखावर आणणे सहज शक्य होते असे दिसून येते. परंतु प्रस्तावीत दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील वादातीत व्यवहाराबाबत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी दिल्यास दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. याउलट प्रस्तावीत दुरुस्ती मान्य केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वादप्रश्न

योग्यरित्या निर्ममित होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे टंकलेखनाची झालेली चूक दुरुस्त करून तसा दावा दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी देणे न्यायोचीत दिसून येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादी याचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी २३) हा रक्कम रुपये ३००/– चा खर्च प्रतिवादी याला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादी याने खर्चाची रक्कम अदा करून मागणी केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या आवश्यक प्रती त्यानंतर तात्काळ सादर करावयात.

Digitally signed by GUNARI SAMEER GOPAL
Date: 2025.09.03 17:41:32 +0530

**(समीर गोपाळ गुणारी)**

**दिनांक – ०३.०९.२०२५** **दिवाणी न्यायाधिश क.स्तर, आमगांव**